| Education Office<br>Zilla Parishad (Secondary)<br>Chelipura Highschool,<br>Station Road,<br>Chhatrapati Sambhaji Nagar-431001 | सत्यमेव जयते<br>महाराष्ट्र शासन | शिक्षणाधिकारी कार्यालय<br>जिल्हा परिषद<br>(माध्यमिक विभाग)<br>चेलीपुरा हायस्कुल, स्टेशन रोड,<br>छत्रपती संभाजीनगर-४३१००१ | |
|---|---|---|---|

दुरध्वनी : (0240) 2348564 e-mail: rmsaaurangabad@gmail.com

जा.क्र.जिपछसं/शि/मावि-११/वेतन अनुदान/२०२३-२४/ 4778 दिनांकः- 21/06/2024

**सुधारित आदेश**

वाचा :- १) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक : माशाअ-२०२२/प्र.क्र.२७५/एसएम-४, दिनांक ६ फेब्रुवारी, २०२३

२) मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र शिसंमा-२०२३ (एस-७)/अनुदान/माध्य-ब/१०५३ दिनांक २१.२.२०२३

३) मा.कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रमांक-माशाअ-२०२२/प्र.क्र.२७५/एसएम-४ दिनांक २३ फेब्रुवारी, २०२३

४) मा.शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र./शिउसं/औ/मावि-१/अनुदान/२०२२-२३/१९०० दिनांक २४ फेब्रुवारी, २०२३

५) मा.शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र क्र.शिसंमा २३/(अ०१)/मुल्यांकन/एस-७/१२८७ दिनांक ६ मार्च, २०२३

६) मा.शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र./शिउसं/औ/मावि-१/अनुदान/२०२२-२३/२२४६ दिनांक ९ मार्च, २०२३

७) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे अनुदान वितरण आदेश क्र.२४/२२०२३३६१ क्र.शिसंमापु /शिक्षक शिक्षकेत्तर/२२-२३/टी-५/३३६१/१३९२ दिनांक १७.३.२०२३

८) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे अनुदान वितरण आदेश क्र.२४/२२०२३३७९ क्र.शिसंमापु /शिक्षक शिक्षकेत्तर/२२-२३/टी-५/३३६१/१३९३ दिनांक १७.३.२०२३

९) या कार्यालयाचे ६० टक्के वेतन अनुदान आदेश जा.क्र./जिपऔ/शि/मावि-११/वेतन अनुदान/२०२२-२३/१९४७-२००१ दिनांक २५ मार्च, २०२३

१०) मुख्याध्यापक, यांनी सादर केलेला प्रस्ताव

११) अंतिम संच मान्यता सन २०२२-२३

**आदेश :-**

'कायम' विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या व 'कायम' शब्द वगळलेल्या (इंग्रजी माध्यम व्यतिरिक्त) त्रुटीपूर्तता केलेल्या शाळांना अनुदान मंजूर करणे, यापूर्वी अंशतः अनुदान घेत असलेल्या शाळा तुकड्यांना वाढीव अनुदानाचा टप्पा व अघोषित असलेल्या माध्यमिक शाळा/वर्ग/तुकड्यांना अनुदानास पात्र घोषित करुन अनुदान मंजूर करणेबाबत संदर्भ क्रमांक १ चे शासन निर्णयान्वये कार्यपद्धती विहित करण्यात आलेली आहे.

संदर्भ क्रमांक २ व ३ चे पत्रानुसार शासन निर्णय दिनांक ६.२.२०२३ अन्वये कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या व कायम शब्द वगळलेल्या (इंग्रजी माध्यम व्यतिरिक्त) त्रुटीपूर्तता केलेल्या शाळांना अनुदान मंजूर करणे, यापूर्वी अंशतः अनुदान घेत असलेल्या शाळा/तुकड्यांना वाढीव अनुदानाचा टप्पा व अघोषित असलेल्या खाजगी माध्यमिक शाळा/वर्ग/तुकड्यांना अनुदानास पात्र करुन शासन स्तरावरुन अनुदान विहित अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूर करण्यात आले आहे.

२/---

संदर्भ क्रमांक ३ चे शासनपत्रान्वये शा.नि.दिनांक १२,१५ व २४ फेब्रुवारी, २०२१ अन्वये त्रुटीमूळे अपात्र असलेल्या शाळांपैकी त्रुटीपूर्तता केलेल्या घोषित माध्यमिक शाळा/वर्ग/तुकड्यांना अनुदान मंजूर करण्यास विहित अटी व शर्तीस अनुसरुन मान्यता देण्यात आलेली आहे.

संदर्भ क्रमांक ७ व ८ अन्वये वरील संदर्भीय शासन निर्णयानुसार अनुदान मंजूर केलेल्या माध्यमिक शाळा/वर्ग/तुकडी मधील शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी, २०२३ पासून प्रत्यक्ष वेतन अदा करण्यासाठी निधी वितरीत करण्यात आला होता.

संदर्भ क्रमांक १ चे शासन निर्णयातील अटी/शर्तीच्या अधीन राहून मुख्याध्यापक यांनी त्यांचे संदर्भ क्रमांक १२ अन्वये शासन निर्णयातील अटी व शर्तीची पूर्तता करित असल्याचे हमीपत्र सादर केले आहे.

वरील बाबी विचारात घेवून या कार्यालयाचे संदर्भ क्रमांक १० चे आदेशानुसार शासनाने वेळोवेळी निर्गमित शासन निर्णयात नमूद पदसंख्येपैकी सन २०२२-२३ च्या अंतरिम संच मान्यतेत मंजुर असलेल्या शिक्षक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी, २०२३ पासून वेतन अनुदान मंजूर करण्यात आले होते.

शासन निर्णयात नमूद पदसंख्या व सन २०२२-२३ च्या अंतिम संच मान्यतेनुसार मंजुर असलेल्या पदांना पुढील प्रमाणे वाढीव २० टक्के सुधारित वेतन अनुदान दिनांक १ जानेवारी, २०२३ पासून मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्था व शाळेचे नांव | घोषित वर्ग/तुकडी | यापूर्वी सुरु असलेला अनुदानाचा टप्पा | **६० टक्के अनुदानास पात्र शिक्षकांची पदे** | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | शासन निर्णयातील पदे | सन २०२२-२३ च्या अंतिम संच मान्यतेनुसार मंजुर शिक्षक पदे |
| 36 | सहारा शिक्षण प्रसारक मंडळ सिडको छत्रपती संभाजीनगर संचालित माध्यमिक विद्यालय नवीन वसाहत मुकुंदवाडी छत्रपती संभाजीनगर | 8 वी ते 10 वी (दुसरा वर्ग) | 40 टक्के | 7 | 7 |

**टिप : सन २०२२-२३ च्या अंतिम संच मान्यता व सुधारित आदेशानुसार पात्र ठरत असलेल्या कर्मचाऱ्यांना वाढीव २० टक्के वेतन अनुदानाबाबतची कार्यवाही करावी.**

**(मधुकर देशमुख)**
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, छत्रपती संभाजीनगर

प्रत :-

१) मा.शिक्षण उपसंचालक, छत्रपती संभाजीनगर विभाग छत्रपती संभाजीनगर यांना माहितीस्तव सादर.

२) अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक, (माध्यमिक) छत्रपती संभाजीनगर यांना देवून कळविण्यात येते की, संबंधिताच्या वेतन अदा करण्याबाबत नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

३) मुख्याध्यापक, माध्यमिक विद्यालय नवीन वसाहत मुकुंदवाडी छत्रपती संभाजीनगर यांना देवून कळविण्यात येते की, अंतिम संच मान्यता व सुधारित वेतन अनुदान आदेशानुसार कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.